जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे,
प्रभाकर हेगडे मार्ग, कोर्ट नाका, ठाणे प. ४००६०१
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२५४७४५७४/२५४७९७२८/२५४७१६२४

दि. ०८/०९/२०२६

शुध्दीपत्रक

संदर्भः- जिल्हा न्यायालय, ठाणे/ई-निविदा/०३/२०२६, दि. २५/०८/२०२६.

जिल्हा न्यायालय, ठाणे येथील जिल्हा न्यायाधीश-१०, व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे या विशेष जलदगती न्यायालयाकरीता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने लिपीक टंकलेखक-०३ व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.)-०२ पदांची सेवा उपलब्ध करून घेण्याकामी करारासाठी शासनमान्य निविदाधारकांकडून ई-निविदा मागविण्यात येत असून सदबाबत जिल्हा न्यायालय, ठाणे व महाटेंडर यांच्या संकेतस्थळावर दिनांक २५/०८/२०२६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी मा. कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, मुंबई यांचे दिनांक ०५/०८/२०२६ रोजी किमान वेतनाचे दरांमध्ये बदल झाल्यामुळे सदर जाहिरातीमधील अंदाजित खर्चाच्या रक्कमेमध्ये वाढ होत असून सदर बदलत असलेल्या नवीन दराबाबत जाहिरातीमधील विभाग : १ मधील अ.क्र. ३ मधील नमूद दर व परिशिष्ट मधील नमूद दर या शुध्दीपत्रकाद्वारे बदलण्यात येत असून उर्वरीत जाहिरात तशीच ठेवण्यात येत आहे. याबाबत सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी व त्याप्रमाणे आर्थिक निवीदा सादर करावी.

अ.क्र.	जाहिरातीमधील जुने दर	जाहिरातीमधील नवीन दर
१.	अंदाजीत खर्चाची रक्कम (वार्षिक) रूपये ११,७६,६००/-	अंदाजीत खर्चाची रक्कम (वार्षिक) रूपये ११,९३,१६०/-

सही/-
(बी. डी. शेळके)
जिल्हा न्यायाधीश-१ व
अति. सत्र न्यायाधीश, ठाणे

सही/-
(एस. पी. अगरवाल)
जिल्हा न्यायाधीश-६ व
अति. सत्र न्यायाधीश, ठाणे

सही/-
(आर. एम. राठोड)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व
अति. सत्र न्यायाधीश, ठाणे

सही/-
(रंजना सरोदे (झीने))
वरिष्ठ न्यायालयीन व्यवस्थापक,
ठाणे

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे,

प्रभाकर हेगडे मार्ग, कोर्ट नाका, ठाणे प. ४००६०१

दूरध्वनी क्रमांक: ०२२-२५४७४५७४/२५४७३७२८/२५४७१६२४

संदर्भ:- जिल्हा न्यायालय, ठाणे/ई-निविदा/०३/२०२६ **दि. २५/०८/२०२६**

जिल्हा न्यायालय, ठाणे येथे नवीन विशेष जलदगती न्यायालये सुरू करण्याकरीता मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी बी(डब्ल्यु)ए-२१०८/२०१९/६७४/१३३२, दिनांक ०९/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये व महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : जगन्य १४१९/प्र.क्र.४/का-नऊ, दि. ०५ मार्च, २०२६ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

जिल्हा न्यायालय, ठाणे येथील जिल्हा न्यायाधीश-१०, व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे या विशेष जलदगती न्यायालयाकरीता बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने लिपीक टंकलेखक-०३ व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.)-०२ पदांची सेवा उपलब्ध करून घेण्याकामी करारासाठी शासनमान्य निविदाधारकांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

विभाग :- ०१

१) निविदा स्वरुप	:	जिल्हा न्यायालय, ठाणे येथील जिल्हा न्यायाधीश-१०, व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे या न्यायालयाकरीता बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने लिपीक टंकलेखक-०३ व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.)-०२ पदांची सेवा उपलब्ध करून देणे.
२) निविदा फॉर्म फी	:	**रु. ३,०००/- ना परतावा (अक्षरी तीन हजार रु.)**
३) अंदाजित रक्कम	:	**रुपये ११,९३,१६०/- (एक वर्षाकरीता)**
४) बयाणा रक्कम	:	**रु. ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रु.)** (शासकीय नियमानूसार सूट असल्यास वगळून) शिथील.
५) कामाचा कालावधी	:	**१ वर्षे**
६) सुरक्षाठेव रक्कम	:	निविदा रकमेच्या **३ टक्के**

२/...

७) ई-निविदा विक्री व सादर करणेस सुरुवात दिनांक : **दि. २५/०८/२०२६** सायं. ५.३० वाजेपासून

८) ई-निविदा स्विकारणेचा अंतिम दिनांक : **दि. १७/०९/२०२६** सायं ५.३० पर्यंत

९) ई-निविदा उघडण्याचा दिनांक : अ) तांत्रिक निविदा- लिफाफा क्र १- जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे **दि. २१/०९/२०२६ रोजी दुपारी २.३० वा.** उघडण्यात येतील.

ब) व्यापारी/आर्थिक निविदा-लिफाफा क्र २- तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविण्यात येईल.

.....

विभाग :- ०२

जिल्हा न्यायालय, ठाणे येथील जिल्हा न्यायाधीश-१०, व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे या न्यायालयाकरीता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने घ्यावयाच्या सेवा खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	सेवा	मनुष्यबळ संख्या
१	लिपीक टंकलेखक	०३
२	बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.)	०२
बाह्ययंत्रणेद्वारे एकूण मनुष्यबळ		०५

विभाग ०३ :- अटी व शर्ती

१) ई-निविदा तांत्रिक लिफाफा (Technical Bid) व आर्थिक लिफाफा (Financial Bid) या दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. सदर कंत्राटाचा कालावधी एक वर्षाचा राहील.

२) निविदाधारकांना निविदा अर्ज, निविदेतील अटी व शर्ती, कामाचे स्वरुप यांची संक्षिप्त माहिती https://www.mahatenders.gov.in तसेच https://districts.ecourts.gov.in/thane संकेतस्थळावरुन डाउनलोड करता येतील.

३) **निविदा फॉर्म शुल्क**:- निविदा फॉर्मची किंमत रक्कम **रुपये ३,०००/- (अक्षरी:- तीन हजार मात्र)** ना-परतावा राहील. निविदा फॉर्म शुल्क **ऑनलाईन** पध्दतीने स्विकारण्यात येईल.

४) **बयाणा रक्कम**:- निविदा धारकाने बयाना रक्कम(EMD) **रु. ५०,०००/- (अक्षरी:- पन्नास हजार रुपये)** ऑनलाईन पध्दतीने भरणे निविदाधारकांवर बंधनकारक आहे. तसेच ज्या निविदाधारकांना बयाणा रक्कम भरणेपासून सुट असेल अशा निविदाधारकांनी त्यांचे सुट प्रमाणपत्र (Exemption Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे.

५) **सुरक्षा ठेव** :- ज्या निविदेधारकांची निविदा मान्य करण्यात आली आहे, त्या निविदाधारकास निविदा रकमेच्या **३ टक्के** रक्कमेची राष्ट्रीयकृत बॅंकेची **एक** वर्षाच्या कालावधीकरिता बॅंक गॅरंटी या कार्यालयाकडे जमा करावी लागेल. तसेच कंत्राटदाराने कराराच्या कोणत्याही अटी व शर्तींचा भंग केल्यास, बॅंक गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

६) निविदाकारांना / कंत्राटदारांना जिल्हयातील न्यायालयांत करावयाच्या साफसफाईच्या कामांची व्याप्ती व माहिती जाणून घेणे कामी न्यायालयांना समक्ष भेट द्यावयाची असल्यास **जिल्हा न्यायालय, ठाणे नवीन इमारत, ४ था मजला, रूम नंबर ४१५, सहा. अधीक्षक, रोख व वित्त विभाग** येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी ११:०० ते सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत भेट देऊ शकतात.

४/...

७) ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात येईल, त्यांना सदर कामाचे आदेश मिळालेपासून १० दिवसांचे आत सेवा करार करणे बंधनकारक असेल.

८) **निविदा लिफाफ्यासोबत सादर करावयाची कागदपत्रे**

तांत्रिक लिफाफा (Technical Bid) लिफाफा कमांक १:- निविदाधारकांनी ई-निविदेतील तांत्रिक लिफाफ्यातील आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

अ.क.	आवश्यक असलेली कागदपत्रे
१	निविदाधारकाने बयाना रक्कम ऑनलाईन अदा केलेल्या पावतीची प्रत.
२	निविदाधारकांना बयाणा रक्कम भरणेपासून सुट असेल तर सुट प्रमाणपत्र (Exemption Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे.
३	कंपनी / संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
४	कंपनी / संस्थेचे ई.एस.आय.सी. व पी.एफ. प्रमाणपत्र
५	कंपनी / संस्थेचे प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र
६	कंपनी / संस्थेचे लेबर नोंदणी प्रमाणपत्र
७	कंपनी / संस्थेचे जी.एस.टी कर नोंदणी प्रमाणपत्र व जी.एस.टी. क्लिअरन्स प्रमाणपत्र
८	कंपनी / संस्थेचे मागील ३ वर्षाचे आयकर प्रमाणपत्र व पॅन कार्ड
९	ई-निविदाकाराने स्वता:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे सत्य प्रतिज्ञापत्र (नोटरी केलेले) दाखल करावे.
१०	कंपनी/संस्थेस काळया यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्याबाबत निविदाकाराचे प्रतिज्ञापत्र (नोटरी केलेले) दाखल करावे.
११	निविदाकाराने लिपीक टंकलेखक व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.) या पदाकरीता शासकीय सेवा दिल्याबाबत सेवा घेणा-याकडील अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे अत्यंत आवश्यक आहे.

-: महत्वाची सुचना :-

जाहिरातीमध्ये मागणी केलेल्या उपरोक्त कागदपत्रां व्यतिरिक्त अनावश्यक व तेच तेच कागदपत्रे अपलोड करू नयेत, महाटेंडर साईटवर दिलेल्या कमानुसार कागदपत्रे अपलोड करावीत.

५/...

९) तांत्रिक लिफाफा उघडणेकरिता निविदाधारकांनी स्वत: अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीसोबत (योग्य त्या अधिकारपत्रासह) तांत्रिक लिफाफ्यामध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणी करिता सादर करणे बंधनकारक आहे. निविदाधारकांनी मुळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा कागदपत्रे अपूर्ण सादर केल्यास किंवा अपलोड केलेल्या प्रती आणि मुळ प्रतींमध्ये फरक / तफावत आढळल्यास सदर निविदा, अस्विकृत / रद्द समजण्यात येईल.

१०) तांत्रिक लिफाफा उघडणेकरिता व कागदपत्रांची पडताळणी करणेकरिता दिनांक २१/०१/२०२६ रोजी दुपारी २.३० वाजता जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे निविदाधारकांनी अथवा त्यांचे प्रतिनिधींनी योग्य त्या अधिकारपत्रासहीत हजर असणे आवश्यक आहे. निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी मुळ कागदपत्रासह हजर न राहिल्यास त्यांची निविदा, अस्विकृत / रद्द समजण्यात येईल.

११) तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर पात्र व अपात्र निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अधिपत्याखालील समितीस राहील. पात्र ठरविणेत आलेल्या निविदाधारकांचे व्यापारी / आर्थिक लिफाफा उघडण्यात येतील.

१२) तांत्रिक लिफाफ्यात पात्र झालेल्या निविदाधारकांना व्यापारी / आर्थिक लिफाफा उघडणेचा दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

१३) आर्थिक लिफाफा (Financial Bid)

लिफाफा क्रमांक २:- व्यापारी / आर्थिक निविदाधारकांनी सदर लिफाफा https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदेतील BOQ मध्ये विहित केलेल्या नमुन्यातच सादर करणे आवश्यक आहे.

१४) व्यापारी / आर्थिक लिफाफा (BOQ) हा ऑनलाईन पध्दतीनेच सादर करावा. तसेच निविदाधारकांनी प्रपत्र-१ (BOQ) नुसार व्यापारी/आर्थिक निविदा सादर न केल्यास अथवा त्यात तफावत आढळल्यास सदर प्रपत्र-१ (BOQ) आणि निविदा, अस्विकृत / रद्द करण्यात येईल.

१५) व्यापारी / आर्थिक लिफाफा उघडतेवेळी पात्र निविदाधारकांनी स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी निविदाधारकाने प्रदान केलेल्या योग्य त्या अधिकार पत्रासह उपस्थित रहावे.

१६) तांत्रिक कारणामुळे ई-निविदा प्रक्रियेतील वेळापत्रकात बदल केला जाऊ शकतो. त्याबाबत सूचना कार्यालयाच्या संकेतस्थळावर व ई-निविदा पोर्टलवर वेळोवेळी प्रदर्शित केल्या जातील.

१७) सदर कामाचे कोणत्याही स्तरावर एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अध्यक्षतेखालील समितीने राखून ठेवले आहेत.

१८) जाहिरातीमध्ये नमूद न्यायालयाकरीता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने नेमण्यात आलेल्या लिपीक टंकलेखक व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.) यांना न्यायालयाने व कार्यालयाने नेमून दिलेली सर्व कामे करणे बंधनकारक राहील.

१९) लिपीक टंकलेखक व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.) या कामी कंत्राटदारामार्फत नियुक्त केल्या जाणा-या काममगार यांचेकडे शासकिय कार्यालयामध्ये कामकरण्याकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता व प्रमाणपत्रे असणे आवश्यक आहे. तसेच लिपीक टंकलेखक या पदाकरीता मराठी व इंग्रजी टंकलेखन व एम.एस.सी.आय.टी. इत्यादी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. कंत्राटदारामार्फत नियुक्ती केल्या जाणा-या काममगाराचे शैक्षणिक प्रमाणपत्रे नियुक्तीपुर्वी या कार्यालयात सादर करणे कंत्राटदारास बंधणकार राहील.

२०) जिल्हा न्यायालय, ठाणे येथील जिल्हा न्यायाधीश-१०, व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे या विशेष जलदगती न्यायालयामध्ये लिपीक टंकलेखक व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.) यांनी करावयाची कामे पुढीलप्रमाणे असतील.

(१) लिपिक टंकलेखक :- नेमणूक केलेल्या न्यायालयासमोरील सर्व कामे, संगणकामध्ये केसेस अदयावत करणे, विविध रजिस्टर लिहिणे आणि हाताळणे, मासिक, त्रैमासिक, वार्षिक माहिती, सांख्यिकीय माहिती तयार करुन सदर अहवाल जिल्हा न्यायालय, ठाणे यांचेमार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे पाठविणे. तसेच न्यायीक अधिकारी व वरिष्ठांनी नेमुण दिलेले इतर कोणतेही काम.

(२) बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई) - फर्निचर आणि यंत्रसामग्रीसह संपूर्ण कार्यालयाचा (कचरा आणि धुळ साफ करणे). कागदपत्रे, कागदाची पुस्तके, तसेच पार्सल बाईंडिंग करणे. विविध विभाग आणि कार्यालयांना पत्रे/पार्सल वितरीत करणे, न्यायालयासमोरील नेमूण दिलेली सर्व कामे करणे. तसेच न्यायीक अधिकारी व वरिष्ठ यांनी नेमुण दिलेली न्यायालयीन व कार्यालयीन सर्व कामे.

२१) कंत्राटदारास तो उपलब्ध करून देत असलेल्या कंत्राटी सेवांसाठी शासन निर्णय क्र. पदनि/२५१२ प्र.क्र./१५७ का.१२, दिनांक २७/०२/२०१३, २६/०२/२०१३, ०६/०३/२०१३, १९/०३/२०१३, ०३/०९/२०१४ व २७/०१/२०१५ व या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या सर्व शासन निर्णयातील (सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashrta.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.) निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

२२) कंत्राटदारांनी त्यांच्यामार्फत सदरील कामासाठी नियुक्त केलेल्या कामगारांना द्यावयाची वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्याची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी नसावी.

२३) खाजगी कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात येणा-या कंत्राटी कामगारांची माहिती व त्यांची चारित्र्यविषयक प्रमाणपत्रे या कार्यालयात सादर करतील.

२४) कामगारांच्या कामाच्या वेळा कंत्राटदार हे न्यायालयाच्या वेळेनुसार ठरवतील. तसेच सुट्टीच्या दिवशी देखील गरज भासल्यास काम करावे लागेल.

२५) सदर कामाकरीता कंत्राटदार यांना देय मोबदला हा एक महिन्याचा कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल. काही तांत्रिक अथवा अपरिहार्य कारणास्तव मोबदला देण्यास उशीर झाल्यास सदर रक्कमेवर व्याज देय राहणार नाही. तसेच देण्यात येणा-या मोबदल्यावर कर भरण्याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदार यांची राहील.

८/...

२६) कंत्राटदारास लिपीक टंकलेखक व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई) या कामासाठी त्यानी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती लागु करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

२७) लिपीक टंकलेखक व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.) या कामी कंत्राटदारामार्फत नियुक्त केल्या जाणा-या कामगारांना अदा करावयाची वेतनाची रक्कम, ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदारांडून कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + भविष्य निवांह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम कामगारांना अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२८) कंत्राटदाराने न्यायालयीन कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदींपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधित कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करून त्याचे नावं काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२९) त्या अनुषंगाने कंत्राटदार यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी नेमणुक केलेल्या कर्मचा-यांच्या वेतनाबाबतच्या किंवा सेवेबाबतच्या कोणत्याही तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाही याची त्यांनी दखल घ्यावी.

३०) कार्यालय बंद असेल त्या दिवशी कामगारांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापि कार्यालय बंद असेल त्या दिवशी कामगारांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्यासाठी त्यांना वेगळा मोबदला मिळणार नाही. किमान वेतन कायद्यातील तरतुदींप्रमाणे कंत्राटी कामगाराला दर आठवडयास एक (रविवारी) भरपगारी सुट्टी देणे तसेच दुसरा व चौथा शनिवार कंत्राटी कामगाराना कार्यालयात बोलविण्यात आल्यास उपस्थित राहणे ही बाब कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील.

९/...

३१) सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामगारांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे त्या दिवसाचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामगारांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्याऐवजी त्या कंत्राटी कामगारास बदली रजा अथवा किमान वेतन अधिनियम व कामगार कायद्यानुसार देय असलेले त्या दिवसाचे वेतन यापैकी कोणताही एक पर्याय निवडता येईल.

३२) कामगाराचे बदली रजेच्या/गैरहजेरीच्या दिवशी दुसरा कामगार उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल व उपलब्ध करून देण्यात आलेल्या कामगारांसाठी किमान वेतन कायदा व कामगार कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ते वेतन संबंधित कार्यालयाकडून अदा करण्यात येईल.

३३) शासकीय वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीक भत्ता (ओव्हरटाईम) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर असेल.

३४) कंत्राटदार यांनी नेमणुक केलेले शिपाई हे सर्व एकसारख्या सफेद गणवेशात असावेत तसेच त्यांना कंत्राटदारकडून ओळखपत्र देण्यात यावे.

३५) कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेवेबद्दल ते किंवा त्यांचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगार यांना या कार्यालयाकडे कायमस्वरूपी नियुक्तीकरीता हक्क मागण्याचा अधिकार राहणार नाही.

३६) कंत्राटदार व त्यांच्या वतीने नेमण्यात आलेले कंत्राटी कामगार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत. याची जाणीव ठेवून सदर कार्यालयीन बाबी संबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याबाबतची दक्षता घेतील. गोपनियतेचा भंग झाल्यास सदरचा करार अंशत:/पुर्णत: रद्द करण्यात येईल. तसेच कंत्राटदार व त्यांच्या वतीने नेमण्यात आलेले कंत्राटी कामगार यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१०/...

३७) कंत्राटदाराचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांची कार्यालयातील वर्तणुक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायीत्व हे कार्यालयाच्या सर्व हितसंबंधाचे रक्षण करणेच राहील. तसेच त्यांचे अशोभनीय वर्तन उदा. तंबाखु, गुटखा खाताना, मद्यपान करून कामावर आल्याचे आढळल्यास, मोठ्यामोठ्याने बोलून शांततेचा भंग इत्यादी करत असल्याचे आढळल्यास त्या कामगारास काढून टाकणेसंबंधीचे आदेश देण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

३८) कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारास काम करतांना कोणतीही इजा, अपघात अथवा मनुष्यहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

३९) कंत्राटासंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास हे कार्यालय नेमतील ते न्यायाधीश लवाद म्हणून काम पाहतील व १९९६ च्या लवादाच्या कायद्यानुसार या विवादाबाबत त्यांचा निर्णय अंतिम असेल.

४०) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे या कार्यालयास आढळून आल्यास कंत्राटदारास देण्यात येणा-या मोबदल्यामधुन अथवा कंत्राटदाराकडून सदर रक्कम वसुल करण्यात येईल. तसेच कंत्राटदार व कंत्राटी कामगार यांच्यावर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

४१) कंत्राटदाराने नेमलेले कामगार व कार्यालयामध्ये, मालक व कर्मचारी असे संबंध राहणार नाहीत.

४२) कंत्राटदार हे पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, एम्लॉई प्राव्हीडंट फंड ॲक्ट, पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट १९७२, वर्कसमन कॉम्पेन्सेशन ॲक्ट, वर्क्स कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, मिनिमम वेजेस ॲक्ट १९४८, इंडस्टीयल डिसप्युट ॲक्ट १९४७, कॉन्ट्रॅक्ट लेबी (Prohibition & Regulation) ॲक्ट १९८६ या व इतर सर्व कामगार कायद्यांच्या तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी व त्यानुसार होणा-या परिणामांची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. सदरचे काम करण्यासाठी कायदयानुसार लागणारे सर्व परवाने घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४३) कंत्राटदारास अदा करावयाचे देयक प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत प्रत्येक तालुका आस्थापनेवरील कनिष्ठ लिपिक व शिपाई यांचे काम योग्य रितीने व समाधानकारक केल्याबाबतचे व हजेरीबाबत तेथील न्यायालयीन अधिकारी यांच्या सहीच्या प्रमाणपत्र जिल्हा न्यायालय, ठाणे येथे जमा केल्यावरच देयक अदा करण्यात येईल.

४४) जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे सर्व प्रकारची कामे कंत्राटी पध्दतीने करून घेतल्याबाबतचा मासिक अहवाल असमाधानकारक आल्यास कंत्राटदारास देण्यात येणा-या मोबदल्यातुन मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ठरवतील त्याप्रमाणे रक्कम वजा करण्यात येईल.

४५) कंत्राटदाराने कंत्राटी कामगार पुरविताना त्यात बाल कामगारांचा समावेश होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४६) कंत्राटदारास कंत्राटी कामाचा मोबदला अदा करताना त्यातुन नियमाप्रमाणे आयकर कापून घेणेत येईल.

४७) कंत्राटदार यांना एकुण कंत्राटाच्या रक्कमेच्या **३ टक्के** रक्कम मुदत ठेव किंवा बॅंक गॅरंटीद्वारे **एक वर्षाकरीता** सुरक्षा ठेव म्हणून द्यावी लागेल. तसेच त्यांनी कराराची कोणत्याही अटी व शर्तींचा भंग केल्यास, मुदत ठेव/बॅंक गॅरंटीची रक्कम सरकार जमा करण्याचा हक्क या कार्यालयास राहील. सेवा कराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास सदर करार नोटीस देवून रद्द करण्यात येईल आणि सदरचे काम इतर दुस-या एजन्सीकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करून देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

४८) **सर्व ई-निविदा या जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे दिलेल्या तारखेस व वेळी उघडण्यात येतील.**

४९) केवळ ई-निविदा किंवा बयाना/अनामत रक्कम जमा केली म्हणुन कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

.....

१२/...

विभाग ०४ :- निविदा वेळापत्रक

अ.क	तपशील	दिनांक	वेळ
१	ई-निविदा वृत्तपत्रात प्रसिद्धी दिनांक	--	--
२	ई-निविदा विक्री व सादर करणेस सुरुवात दिनांक	२५/०८/२०२६	सायं. ५.३० पासून
३	ई-निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक	१७/०९/२०२६	सायं. ५.३० पर्यंत
४	तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक	२१/०९/२०२६	दुपारी २.३० वाजता
५	आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक	तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविण्यात येईल.	

१३/...

परिशिष्ट

जिल्हा न्यायालय, ठाणे येथील जिल्हा न्यायाधीश-१०, व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे या न्यायालयाकरीता बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवेसाठी एक वर्षाकरिता कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, मुंबई यांचे (किमान वेतन अधिनियम, १९४८) दिनांक ०५/०८/२०२६ रोजीच्या किमान वेतन दरपत्रकानुसार निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

सेवा	कनिष्ठ लिपिक (कुशल)	शिपाई (अकुशल)
अ.क्र.	२	३
किमान मुळ वेतन दर (प्रति महिना व प्रति व्यक्ती) रूपये	११,६३२/-	१०,०२१/-
विशेष भत्याची रक्कम प्रति महिना व प्रति व्यक्ती) रूपये	४,१३४/-	४,१३४/-
भविष्य निर्वाह निधी (१२%)	१,३९६	१,२०३/-
ई.एस.आय.सी. (३.२५ %) रूपये	३७८/-	३२६/-
विमा (०.५०%) रूपये	५८/-	५०/-
एकुण रूपये	१७,५९८/-	१५,७३४/-
सेवा कर (१८%) रूपये	३,१६८/-	२,८३२/-
एकुण वेतन (प्रति महिना व प्रति व्यक्ती) रूपये	२०,७६६/-	१८,५६६/-
मनुष्यबळ संख्या	०३	०२
अंदाजे वार्षिक रक्कम रूपये	७,४७,५७६/-	४,४५,५८४/-

अंदाजीत रक्कम (वार्षिक)	रूपये ११,९३,१६०/-

१४/...

विभाग ०५ :- निविदा अर्ज

निविदा मागविणा-या कार्यालयाचे नांव	:	जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे
कामाचे स्वरुप	:	जिल्हा न्यायालय, ठाणे येथील जिल्हा न्यायाधीश-१०, व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे या न्यायालयाकरीता बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने लिपीक टंकलेखक व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.) या पदांची कंत्राटी सेवा उपलब्ध करून देणे.
निविदा क्रमांक	:	जिल्हा न्यायालय, ठाणे/ई-निविदा/०३/२०२६
कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचे नाव	:	
कंत्राटदार संस्थेचा/ कंपनीचा संपूर्ण पत्ता	:	
कंत्राटदार संस्थेचा/ कंपनीचा संपर्क दूरध्वनी	:	
कंत्राटदार संस्थेचा / कंपनीचा नोंदणी क्र	:	
कंत्राटदार संस्थेचा जी.एस.टी. नोंदणी क्र.	:	

प्रपत्र :- ०१

अ.क्र.	जिल्हा न्यायालय, ठाणे येथील न्यायालयाकरीता बाह्ययंत्रणेद्वारे घ्याव याच्या सेवेचे कामाचे स्वरूप	मागणी करण्यात आलेली कर्मचारी संख्या	सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली रक्कम **(सेवा शुल्कासह वार्षिक खर्च)**	सेवा कर वार्षिक (रूपये)	एकूण रक्कम (रूपये)	एकूण रक्कम अक्षरी रूपये
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**
१	लिपीक टंकलेखक	०३				
२	बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.)	०२				

निविदेची एक वर्षासाठी होणारी एकूण रक्कम रू. .....

(अक्षरी रू.....)

.....

(कंत्राटदाराचे नांव, सही, शिक्का दिनांक)

अ) निविदाधारकांनी आर्थिक लिफाफा तांत्रिक लिफाफ्यासोबत सादर करू नये.

ब) निविदाधारकांनी नमुद केलेले वेतन व भत्याची रक्कम उपरोक्त नमूद परिशिष्ट मधील अ.क्र. १ ते ५ नुसार किमान वेतन कायदयातील तरतुदींपेक्षा कमी नसावे. तसेच सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली रक्कम ही सेवा शुल्कासह नमूद करावी.

हमीपत्र

मी, श्री. ....., प्रो. प्रा..... इंटरप्रायजेस, पत्ता,.....संस्थेचा नोंदणी क्रमांक ....., संस्थेचा दूरध्वनी क्रमांक .....याद्वारे असे हमीपत्र लिहून देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आलेल्या जिल्हा न्यायालय, ठाणे येथील जिल्हा न्यायाधीश-१०, व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे या न्यायालयाकरीता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने लिपीक टंकलेखक व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.) या पदांची कंत्राटी सेवा उपलब्ध करून देणेबाबतची निविदा भरतांना, निविदा अर्जासोबतचे निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या आपल्या कार्यालयातील कामाची माहिती करुन त्यानुसार निविदा भरली आहे. तसेच, मी/आम्ही पुरवठादार सर्व अटी व शर्तिंचे पालन करण्यास बांधील आहोत.

आपल्या कार्यालयाने सदर सेवेसाठी निर्गमित केलेले निर्देशन आमचेवर / भागीदारावर बंधनकारक राहील.

ठिकाण :
दिनांक : / /२०२६

स्वाक्षरी व शिक्का

.....